छ.संभाजीनगर, अमरावती विभागातील सर्व व नागपूर विभागातील वर्धा, या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना थेट रोख रक्कम हस्तांतरण (DBT) योजना महाडीबीटी २.० (MahaDBT २.०) पोर्टलद्वारे राबविण्याबाबत सुधारित प्रमाणभूत कार्यप्रणाली (SOP).

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक: अधापु-२०२५/प्र.क्र.११/नापु-२२,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३० ऑक्टोबर, २०२६

संदर्भ:

१. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक २४.०७.२०१५.
२. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: अधापु-२०२२/प्र.क्र ४६/नापु-२२, दिनांक २८.०२.२०२३.
३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अधापु-२०२४/प्र.क्र ४६/नापु-२२, दिनांक २०.०६.२०२४.

प्रस्तावना :-

छत्रपती संभाजी नगर व अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांतील तसेच नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजनेकरिता विभागाच्या दि. २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹ १५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. तसेच त्याकरिता सविस्तर प्रमाणभूत कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे. तद्नंतर, विभागाच्या दिनांक २० जून, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकाअन्वये, लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभामध्ये वाढ करण्यात आली असून माहे एप्रिल, २०२४ पासून प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹ १७०/- अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

मा. सचिव (अ.ना.पु.व ग्रा.सं. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ व २३ जानेवारी, २०२५ रोजी पार पडलेल्या विभागाच्या आढावा बैठकीमध्ये **"सदर योजना महाआयटी मार्फत DBT करण्याची प्रक्रिया करावी"** असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच ही प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान,

त्रुटीरहित व एकात्मिक करण्यासाठी सदर योजनेचा शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) करुन त्यानूसार सदर योजना महाडीबीटी २.० या एकात्मिक प्रणालीवर समाविष्ट (onboard) करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, बीड, धाराशिव, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना प्रति माह प्रति लाभार्थी रु. १७०/- इतक्या रोख रकमेचे हस्तांतरण ही योजना महाडीबीटी २.० (Mahadbt २.०) (https://mahadbt२.maharashtra.gov.in) या एकात्मिक प्रणालीवर समाविष्ट (onboard) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच प्रतिवर्षी किमान आधारभूत किंमतीत होणाऱ्या वाढीनुसार केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या Cash Transfer of Food Subsidy Rules, २०१५ मधील तरतुदीनुसार प्रतिमाह प्रतिलाभार्थी सुधारित वाढीव रोख रक्कम (पुढील दशकाच्या पूर्णांकात) थेट हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. **सदर योजना Mahadbt २.० प्रणालीद्वारे कार्यान्वित करण्यासाठी प्रमाणभूत कार्यप्रणाली (Standard Operating Procedure - SOP) खालीलप्रमाणे असेल:-**

१) शेतकरी योजनेच्या लाभासाठी पात्र शिधापत्रिकाधारकांची सद्यस्थितीत विभागाकडे उपलब्ध असलेली RCMS वरील माहिती, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या. यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तद्नंतर, महासारथी प्रणालीमार्फत RCMS प्रणालीवरील लाभार्थ्यांची माहिती Mahadbt २.० प्रणालीवर स्वयंचलितपणे उपलब्ध करण्यात येईल.

२) याकरिता तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर संबंधित अधिकाऱ्यांना लॉगीन देण्यात येईल.

अ) तालुका स्तरावरील सक्षम अधिकारी :-

- तालुका स्तरावरील सक्षम अधिकारी महाडीबीटी २.० पोर्टलवर लॉगिन करतील.
- वित्तीय वर्ष, महिना, रास्तभाव दुकान (FPS) निहाय प्राप्त झालेल्या RCMS डेटाची तपासणी करतील.
- संबंधित कुटुंबातील आधार संलग्न बँक खाते (Aadhaar Linked Bank Account) उपलब्ध असलेल्या पात्र सदस्याची (महिला कुटुंबप्रमुख प्रमुख) लाभाच्या वितरणासाठी (Disbursement) निवड करून अर्ज जिल्हास्तरावर अग्रेषित (Submit) केला जाईल.
- जर महिला कुटुंब प्रमुखाचे आधार संलग्न बँक खाते नसल्यास कुटुंबातील इतर सदस्यांच्या आधार संलग्न बँक खाते निवडावे.

ब) जिल्हास्तरीय सक्षम अधिकारी (DSO) :-

- जिल्हास्तरीय सक्षम अधिकारी तालुकास्तरावरून प्राप्त झालेल्या अर्जांची/लाभार्थ्यांची छाननी करतील.
- प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करून संबंधित लाभार्थ्यांना पोर्टलवर एकत्रित मंजुरी (Bulk Approval) किंवा त्रुटी आढळल्यास कारणासह अर्ज नामंजूर (Reject) करतील.

क) राज्य नोडल अधिकारी (State Nodal Officer - SNO):

- राज्य नोडल अधिकारी जिल्हास्तरावरून मंजूर झालेल्या लाभार्थ्यांची संख्या आर्थिक वर्ष व हप्ता निवडून व अनुज्ञेय निधीनुसार अनुदानाची रक्कम तपासून पोर्टलवर -"Allocate Beneficiaries" ची प्रक्रिया पूर्ण करतील.
- त्यानंतर पोर्टलवरून बिल किंवा 'रिक्वेस्ट फॉर ट्रान्सफर' (RFT - Request for Transfer) तयार (Generate) करून पडताळणीअंती पुढील स्वाक्षरीसाठी आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे सादर करतील.

ड) आहरण व संवितरण अधिकारी (DDO):

अ) आहरण व संवितरण अधिकारी (DDO) महाडीबीटी पोर्टलवर लॉगिन करून तयार झालेल्या RFT वर डिजिटल स्वाक्षरी करतील.

ब) RFT स्वाक्षरीनंतर XML फाईल जनरेट (Generate XML) करून त्यावर डिजिटल स्वाक्षरी करून पेमेंट ट्रिगर (Payment Trigger) करतील.

क) ही प्रक्रिया पूर्ण होताच लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात प्रति महिना प्रति सदस्य ₹ १७०/- प्रमाणे थेट रक्कम (DBT) वर्ग करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

ई) सदर योजनेअंतर्गत वितरित करावयाची रोख रक्कम महिला कुटुंबप्रमुखाच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. महिला कुटुंबप्रमुख नसल्यास वा महिला कुटुंब प्रमुखाचे बँक खाते आधार संलग्न नसल्यास कुटुंबातील वरिष्ठ पुरुषाच्या वा अन्य सदस्याच्या आधार संलग्न बँक खात्यात अनुदान जमा करण्यात येईल.

फ) प्रस्तुत योजनेचा लाभ मिळण्यासाठी शिधापत्रिकेवर नोंद असलेल्या सर्व सदस्यांचे आधार क्रमांक शिधापत्रिका व्यवस्थापन (RCMS) प्रणालीशी संलग्न करणे तसेच शिधापत्रिकेवर नोंद असलेल्या प्रत्येक लाभार्थ्यांची e-KYC प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असेल.

ब) कुटुंबातील एखाद्या सदस्याकडे आधार क्रमांक नसल्यास त्यास आधार कार्ड तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत संबंधित तहसिलदार कार्यालयाकडून मार्गदर्शन करण्यात यावे.

४. सदर योजनेचा लाभ महाडिबीटी २.० या प्रणालीमार्फत आधार संलग्न खात्यामध्ये माहे एप्रिल-२०२६ पासून वितरीत करण्यात यावा.

५. सदर योजनेसाठी पात्र ठरत असलेल्या नवीन शिधापत्रिकाधारकांची RCMS प्रणालीवर नोंदणी पूर्ण झाल्यानंतरच्या पुढील महिन्यात DBT योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

६. प्रस्तुत योजनेकरिता लेखाधिकारी, नागरी पुरवठा, वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून तसेच, राज्यस्तरीय नोडल अधिकारी (SNO) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत योजनेसाठी येणारा खर्च २४०८, अन्न साठवण व वखार, ०१ अन्न, १०१ प्रापण व पुरवठा, (०३) प्रापण, वितरण व किंमत नियंत्रण, (०३) (२७) शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजना (कार्यक्रम/दत्तमत) (२४०८०८८८), ३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पित तरतूदीमधून भागविण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६१०३०१६३१४००९०६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=1D60828C41033AB1DA6D64EF17879745D578B334C05C1E8151EF933F134060BC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2026.10.30 16:32:31 +05'30'

(संतोष गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा) यांचे खाजगी सचिव.
५) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
६) मा. राज्यमंत्री , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१२) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१३) सर्व उपायुक्त (पुरवठा).
१४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
१५) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
१६) सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

१७) सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई.
२०) निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).